# सामाजिक जाणिवेतून आदर्श नागरिक निर्माण व्हावा

## व्ही. ए. पाटील : हळबे महाविद्यालयात शिक्षक-पालक मेळावा

दोडामार्ग : केवळ शैक्षणिक पदवी मिळविणे म्हणजे सुशिक्षित झाले असे नाही, तर विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व सामाजिक जाणिवा निर्माण व्हाव्यात, त्यांच्यात एक आदर्श नागरिक निर्माण व्हावा, यासाठी महाविद्यालयांतर्गत राष्ट्रीय सेवा योजना, महिला विकास कक्ष, सांस्कृतिक विकास, क्रीडा विभाग, वाङ्मय मंडळ, आदी विविध विभागांतून नावीन्यपूर्ण उपक्रम राबविले जातात. त्यातून विद्यार्थ्यांचे कलागुण, नेतृत्वगुण, समाजसेवा, आदी गुणांत वाढ होण्यासाठी मदत होते, असे विचार प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांनी काढले.

येथील लक्ष्मीबाई हळबे महाविद्यालयात सतत तीन दिवस विविध वर्गाच्या विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालक, शिक्षकांचा मेळावा झाला. यावेळी डॉ. पाटील यांनी मार्गदर्शन केले.

तीन दिवस चाललेल्या या स्नेहमेळाव्यास पालक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. पालक प्रतिनिधी म्हणून रामचंद्र गवस, शीतल हरमलकर, शुभांगी कुबल, प्रभाकर गवस यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी पालकांनी आपले प्रश्न व त्यावरील उपाय तसेच विद्यार्थ्यांच्या प्रश्नांची खुल्या अंत:करणाने चर्चा केली. महाविद्यालयाच्या प्राध्यापकांनी त्यावर उपाय सुचविले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक - पालक मेळाव्याचे समन्वयक प्रा. डॉ. एम. टी. बेग तसेच प्रा. दिलीप बर्वे, प्रा. एस. एस. पाडगावकर, प्रा. एस. एन. खडपकर, प्रा. डॉ. आर. एस. इंगळे, प्रा. एस. एन. जाधव यांनी परिश्रम घेतले. देविता पारसकर हिने आभार मानले. (प्रतिनिधी)